


# अलिबागविषयी अचूक अन् परिपूर्ण माहितीचा खजिना

# अलिबाग ऑनलाइन

वारसा | **राजीव पाटील**

> **अलिबागची खरी ओळख आपण स्वतः करून घेणे व साऱ्या जगासमोर मांडण्याचा विचार फार वर्षांपासून मनात होता. आणि, याच विचारातून मग निर्माण झाली टीम अलिबाग ऑनलाइन. आजच्या मध्यमवयीन पिढीकडे अलिबागविषयी असलेले जे ज्ञान व माहिती, इतिहास, सांस्कृतिक वारसा, परंपरा आपल्या पुढील पिढीकडे हस्तांतरित करणे, हे महत्त्वाचे उद्दिष्टसुद्धा या वेबसाइटमुळे साध्य होणार आहे. या वेबसाइटसाठी माहिती मिळवताना काही सरकारी पुस्तके व इतर अनेक ऐतिहासिक संदर्भ यांची मदत घेतली आहे.**

**नमस्कार अलिबागकरहो!**

आपले अलिबाग, तुमचे, आमचे, सर्वांचे अलिबाग–महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर वसलेले एक सुंदर शहर. एकीकडे अथांग सागर आणि तीनही बाजूने हिरवीगार झाडी व डोंगर रांगा. रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचे तालुक्याचे ठिकाण, तसेच पर्यटनाच्या दृष्टीनेसुद्धा अलीकडच्या काळात नावाजलेले शहर. पुण्या–मुंबईच्या पर्यटकांचे वीकेंड गेट–वेसाठी आवडते ठिकाण. अलिबाग जसे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, तसेच ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, भौगोलिकदृष्ट्यासुद्धा महत्त्वाचे आहे. पण, आजकालच्या सुपरफास्ट जीवनामध्ये अलिबागची ओळख फक्त काही समुद्रकिनारे, काही निवडक किल्ले आणि मासे इतकीच मर्यादित राहिलेली दिसते. आपण अलिबागच्या रहिवाशांनीसुद्धा जर विचार केला, तर आपल्याला तरी आपल्या खऱ्या अलिबागची पूर्ण ओळख आहे का? हा प्रश्न पडतो. आपण अलिबागकडे ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, भौगोलिक दृष्टीने किती पाहिले आहे? मग या पर्यटकांना आणि पर्यटनाला योग्य दिशा कोठून मिळणार?

**गरज आपले अलिबाग ओळखण्याची :–**

आपल्या अलिबागची ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, भौगोलिक ओळख ही अजूनही जगाला अपरिचित आहे. आपल्या रायगड जिल्ह्याला लोहयुगापासून इतिहास आहे. रायगड जिल्ह्यावर गेली शेकडो वर्षे जवळ जवळ १९ वेगवेगळ्या राजवटींनी राज्य केले. यामध्ये मौर्य, सातवाहन, क्षत्रप, त्रैकूटक, कलचुरी, कोकणचे मौर्य, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव, बहमनी, गुजरातचे सुलतान, अहमदनगरची निजामशाही, पोर्तुगीज, सिद्दी, मराठे, मुघल, आंग्रे व ब्रिटिश अशा राजवटी येतात. या सर्व राजवटींनी त्यांच्या कलेची, संस्कृतीची छाप येथे ठेवली. त्यातून विविध कला व वास्तुनिर्मिती होत गेली, त्यापैकी थोडीफार अजूनही शिल्लक आहे. येथील विविध राजवटी, त्यांच्या चालीरीती, पराक्रम व इतर घटनांची साक्ष देणारे शिलालेख अजूनही विविध ठिकाणी सापडतात. येथील विविध देवस्थानांवर त्या त्या

काळाच्या कलेची छाप पडलेली दिसून येते. अलिबागजवळील चौल, रेवदंडा ही गावे तर जवळ जवळ दोन हजार वर्षांहून जास्त जुना इतिहास सांगतात. येथील पर्यटन तेव्हापासून प्रसिद्ध आहे हे विविध देशी–विदेशी पर्यटकांच्या भेटीवरून व त्यांनी केलेल्या लिखाणावरून दिसून येते.

सतराव्या शतकात मराठा साम्राज्याचे सेनापती सरखेल कान्होजी आंग्रे यांचा अलिबाग शहर वसविण्यामध्ये खूप मोलाचा वाटा आहे. रेवदंडा, चौल, नागाव, आक्षी, वरसोली, थळ, किहीम आणि आवास ही गावे त्यावेळी समृद्ध अशी अष्टागरे म्हणून ओळखली जात. अलिबाग परिसरामध्ये स्वराज्यामधील अनेक समुद्री किल्ले बांधण्यात आले. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये अलिबागमध्ये पृथ्वीच्या अंतरंगातील लोहचुंबकीय शक्तीचे संशोधन आणि आलेखन करणारी भारतातील पहिली चुंबकीय वेधशाळा उभारण्यात आली. याच दरम्यानच्या काळामध्ये अलिबागजवळील सासवणे येथे श्री. नानासाहेब करमरकर हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार होऊन गेले. भारताचे 'बर्डमॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ. सालेम अली, अलिबागजवळील किहीम येथे जवळजवळ आठ वर्षे वास्तव्यास होते. येथे राहून त्यांनी पक्षीनिरीक्षण करत अनेक पुस्तकेसुद्धा लिहिली. कनकेश्वराच्या डोंगरावर परदेशी पक्षी दरवर्षी येतात आणि हे पक्षीनिरीक्षण करायला आंतरराष्ट्रीय पक्षी निरीक्षकसुद्धा येथे येतात. फणसाड येथील अभयारण्य तर निसर्ग संपदेने समृद्ध आहे. काही वर्षांपूर्वी मराठीतील आद्य शिलालेख आक्षी येथे सापडला आहे.









आजच्या तारखेला कोणी पर्यटक अलिबागला फिरायला आले आणि आपल्याला विचारले की, अलिबागमध्ये पाहण्यासारखे काय काय आहे? तर किती स्थळांची नावे आपल्याला सांगता येतात? फारच थोडी, त्यातही बहुतांशी समुद्रकिनारे आणि एक–दोन किल्ले. आजच्या पिढीकडे आणि पूर्वीच्या पिढीकडे असलेले ज्ञान, माहिती, संस्कृती, परंपरा, इतिहास आपल्या पुढील पिढीकडे हस्तांतरित करणे गरजेचे आहे. जेणेकरून हे वैभव असेच अबाधित राहील.

**आधुनिक माध्यमांची मदत :–**

तर मंडळी एवढे सगळे लिहायचा उद्देश हाच की, आपल्या अलिबागची खरी ओळख आपण स्वतः करून घेणे व साऱ्या जगासमोर घेऊन येणे फार गरजेचे आहे. हाच विचार फार वर्षांपासून मनात होता. आणि याच विचारातून मग निर्माण झाली टीम 'अलिबाग ऑनलाइन'. 'अलिबाग ऑनलाइन'ची टीम गेली साधारणतः ५ ते ६ वर्षे अलिबाग आणि आजूबाजूच्या परिसरातील ऐतिहासिक वास्तू, गडकिल्ले, पुरातन देवस्थाने, प्रसिद्ध ठिकाणे, समुद्रकिनारे, भौगोलिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे अशा प्रकारच्या बऱ्याच ठिकाणांना प्रत्यक्ष भेट देऊन, त्यांच्याविषयी माहिती व संदर्भ गोळा करीत आहे. यासोबत या टीमने अलिबागमधील निसर्ग व जैवविविधता, नैसर्गिक आश्चर्ये, पारंपरिक व्यवसाय, शेती, फळे, फुले इत्यादीविषयीची बरीच माहिती गोळा केली आहे. ही सर्व माहिती आता अलिबागकरांसाठी तसेच संपूर्ण जगासमोर मांडण्याच्या दृष्टीने www.alibagonline.com या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे. या वेबसाइटचा आत्तापर्यंतचा रंजक प्रवाससुद्धा येथे मांडण्यात आला आहे.

आजच्या आधुनिक डिजिटल युगामध्ये समाज माध्यमांद्वारे आपल्याला बरीच माहिती मिळत असते. परंतु, ती माहिती काही वेळेला अर्धवट, तर कधी चुकीचीसुद्धा असू शकते. या वेबसाइटसाठी माहिती मिळवताना काही सरकारी दस्तऐवज व इतर अनेक ऐतिहासिक संदर्भ यांची मदत घेतली आहे. त्यामुळे शक्य तितकी अचूक माहिती देण्याचा प्रयत्न येथे केला आहे. यामध्ये वापरलेले सर्व फोटो व व्हिडिओ हे टीमने स्वतः काढलेले व चित्रित केलेले आहेत. तसेच या वेबसाइटवरील सर्व साहित्य, फोटो, व्हिडिओ याचे (कॉपीराइट्स) हक्क alibagOnline कडे राखीव आहेत. अलिबागविषयी महत्त्वपूर्ण माहिती संकलन, फोटोग्राफी, मुलाखती, तसेच आधुनिक तंत्रज्ञान यांची उत्तम सांगड म्हणजे ही वेबसाइट आहे. या वेबसाइटच्या सहाय्याने आजच्या डिजिटल युगामध्ये आपले अलिबागसुद्धा आता ऑनलाईन झाले आहे.

**जगासमोर खरे अलिबाग आणण्याची गरज :–**

आपल्या खऱ्या अलिबागची ओळख जगासमोर आणणे हे मुख्य उद्दिष्ट ठेवून ही वेबसाइट बनवली गेली आहे. आजच्या मध्यमवयीन पिढीकडे अलिबागविषयी असलेले ज्ञान व माहिती, इतिहास, सांस्कृतिक वारसा, परंपरा आपल्या पुढील पिढीकडे हस्तांतरित करणे हे महत्त्वाचे उद्दिष्टसुद्धा या वेबसाइटमुळे साध्य होणार आहे. त्याचप्रमाणे अलिबाग पाहायला येणाऱ्या आपल्या मित्र–मैत्रिणींना, नातेवाईकांना आता आपल्या अलिबागविषयीची माहिती आपल्याला अभिमानाने सांगता येणार आहे. अलिबागविषयी पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात माहिती आता एकाच ठिकाणी मिळणार आहे. वाचकांच्या सोयीसाठी ही वेबसाईट मराठी व इंग्रजी अशा दोन भाषांमध्ये उपलब्ध आहे.

**या वेबसाईटवर आपण काय पाहू शकाल?**

समुद्रकिनारे प्राचीन देवस्थाने प्रसिद्ध ठिकाणे ऐतिहासिक ठिकाणे, गडकिल्ले, निसर्ग व जैवविविधता, स्थानिक शेती, फळे, फुले, नैसर्गिक आश्चर्ये, प्राचीन शिलालेख, प्राचीन तलाव व बारव (पुष्करिणी), पारंपरिक व्यवसाय, सण व उत्सव, स्थानिक खाद्यपदार्थ, ऐतिहासिक विषयांवरील लेख आणि बरेच काही...

**विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग :–**

अलिबाग ऑनलाइनची टीम अलिबाग परिसरातील विविध उपक्रमांमध्येसुद्धा सहभागी होत असते. ४ फेब्रुवारी रोजी मुरुड येथे संपन्न झालेला पद्मदुर्ग जागर, १०



एप्रिल रोजी आग्राव येथे आयोजित केलेली शिडाच्या होड्यांची स्पर्धा, २४ मे रोजी फणसाड अभयारण्य येथे झालेली वन्यप्राणी गणना, या कार्यक्रमांमध्ये टीम सहभागी झाली होती. तसेच अलीकडेच वायशेत येथील पीएनपी प्राथमिक शाळेमध्ये ओळख अलिबागची या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसोबत संवाद व अलिबागविषयीची माहिती देणे, हा कार्यक्रम आयोजित केला होता. अशा विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन किंवा आयोजित करून अलिबागची संस्कृती, निसर्ग, पर्यावरण, परंपरा, इतिहास याविषयी जनजागृती करणे, हासुद्धा उद्देश 'अलिबाग ऑनलाइन'मार्फत साध्य करण्याचा प्रयत्न होत आहे.

**भारत सरकारने घेतली दखल :-**

भारत सरकारच्या पर्यटन विभागाकडून दरवर्षी पर्यटनाला प्रोत्साहन मिळावे म्हणून विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. याच अंतर्गत आयोजित केलेल्या एका स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून साधारणतः २५ ते ३० केस स्टडीमधून १० केस स्टडी निवडल्या गेल्या, त्यामध्ये 'अलिबाग ऑनलाइन' ही केस स्टडी राज्यपातळीवर निवडली गेली. नंतर पुढच्या टप्प्यामध्ये राष्ट्रीय पातळीवर आलेल्या सर्व केस स्टडीमधून ७५ केस स्टडी निवडल्या गेल्या. यामध्येसुद्धा 'अलिबाग ऑनलाइन' ही केस स्टडी राष्ट्रीय पातळीवर निवडली गेली आहे. या स्पर्धेचा अंतिम निकाल पुढील काही महिन्यांमध्ये जाहीर होईल.



**मित्र परिवार :-**

मित्रहो, आपल्याला काही मोठे साध्य करायचे असल्यास सर्वांना सोबत घेऊन जावे म्हणजे ध्येयापर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुलभ होतो. याच विचारांनी 'अलिबाग ऑनलाइन'ची टीम बनत गेली. या सर्व कामांमध्ये महत्त्वाची साथ लाभली ती 'अलिबाग ऑनलाईन' च्या टीमची : – श्री. निलेश थळे, श्री. गणेश नाईक, सौ. रश्मी पाटील, श्री. राहुल पाटील, श्री. प्रमोद पाटील तसेच भारतीय प्राच्य विद्या अभ्यासक संगीता कळसकर यांची. त्याचप्रकारे लेखन, साहित्य, भाषांतर व तंत्रज्ञान यामध्येसुद्धा मोलाची साथ मित्र परिवाराची लाभली आहे. आणि अजूनही अभ्यासक, कलाकार, साहित्यकार मंडळी लवकरच सामील होतील.

मंडळी, अलिबागचा इतिहास आणि माहिती एवढ्यावरच संपत नाही, तर हे काम असेच निरंतर चालू राहणार आहे. तुमच्याकडे अलिबागविषयी अशी काही महत्त्वाची व अनमोल माहिती असेल तर आम्हाला नक्की कळवा, माहितीची पडताळणी करून आपल्या वेबसाइटवर ती माहिती प्रसिद्ध करण्यात येईल. या सर्व कार्यामध्ये तुम्हा अलिबागकारांचे सहकार्य असेच मिळत राहील, याची खात्री आहे.

तर अलिबागकरहो, चला आपले अलिबाग पुन्हा नव्याने पाहू, अनुभवू व साऱ्या जगापर्यंत पोहोचवू www.alibagonline.com च्या सोबतीने.

आपला अभिप्राय आम्हाला नक्की कळवा, ●●

alibagonlineinfo@gmail.com
(७०३०४०२२०१)

